भव्य मिरवणुकीने प्रचंड जल्लोषात प्रशांत ठाकूर
यांचा उमेदवारी अर्ज दाखल

पनवेल– एकच वादा प्रशांत दादा अशा गगनभेदी घोषणां देत कार्यकर्त्यांच्या प्रचंड जल्लोषात भव्य मिरवणुकीने १८८ पनवेल विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाचे उमेदवार म्हणून प्रशांत ठाकूर यांनी आज दि.२६ रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

२००९ साली शेतकरी कामगार पक्षाची ५२ वर्षांची मक्तेदारी मोडीत काढून पनवेल विधानसभा मतदार संघातून प्रशांत ठाकूर यांनी काँग्रेसला विजय मिळवून दिला.त्यानंतर पाचवर्षात ६०० कोटींची विकासकामे करून पनवेल शहर व तालुक्याचा चेहरामोहरा बदलून टाकला मात्र टोलप्रानांवरन जनतेला दिलेला शब्द सरकार पाळत नाही असे पाहून त्यांनी आपल्या आमदारकीचा राजीनामा देवून निवडणूक न लढविण्याचा निर्धार व्यक्त केला. परंतू त्यानंतर कार्यकर्त्यांच्या दबावाखाली त्यांनी निवडणूक लढविण्यास होकार देत भाजपमध्य प्रवेश केला. त्यासभेत भारतीय जनता पक्षाचे प्रदेश अध्यक्ष विनोद तावडे यांनी पनवेलमधून प्रशांत ठाकूर यांची उमेदवारी जाहिर केली. त्यानुसार आज गुरूवार दि. २६ रोजी सकाळी १० वा. जनसंपर्क कार्यालयापासून कार्यकर्त्यांच्या भव्य मिरवणूकीने जावून त्यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

एका जीपवर भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील, प्रशांत ठाकूर, लोकनेते रामशेठ ठाकूर,लक्ष्मणशेठ पाटील, मुन्नाभाई बेग, वाय.टी देशमुख, जी.आर. पाटील आदी मान्यवर विराजमान झाले होते. हजारो कार्यकर्ते, महिला, युवक, व्यापारी, कामगार तालुक्याच्या ग्रामीण भागातून आलेले ग्रामस्थ भारतीय जनता पक्षाचे झेंडे नाचवत निघालेली ही मिरवणूक प्रशांत दादा आगे बढो हम तुम्हारे साथ है,एकच वादा प्रशांत दादा,अशा घोषणा देत महात्मा गांधी मार्ग, टपालनाका मार्गे शिवछत्रपती पुतळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याला अभिवादन करून बाजारपेठेतून उपविभागीय अधिकारी कार्यालयावर गेली. त्याठिकाणी लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपा रायगड जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब पाटील,जी.आर. पाटील,अरूणशेठ भगत,लक्ष्मणशेठ पाटील आदी मान्यवरांच्या उपस्थितीत प्रशांत ठाकूर यांनी प्रांत अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

त्यानंतर कार्यकर्त्यासमोर बोलताना प्रशांत ठाकूर म्हणाले की,उमेदवारी अर्ज दाखल करतानाच कार्यकर्त्यानी प्रचंड संख्येने मिरवणुकीत सहभागी होवून पनवेलची निवडणूक आपण जिंकली आहे याचे दर्शनच पनवेलकरांना घडविले आहे. आपण गेल्या पाच वर्षात ज्या जिद्दीने विकासाचा रथ दौडत ठेवला आहे. तो विकासाचा वेग असाच कायम ठेवून तालुक्याचा चेहरामोहरा बदलून टाकण्यासाठी येत्या १६ तारखेपर्यत कठोर परीश्रम घ्यायचे आहेत.निवडणूक प्रचारासाठी आपल्याकडे अतिशय थोडेच दिवस शिल्लक असल्याने या १६ दिवसात आपल्याला आपली भुमिका पक्षाचे चिन्ह असलेले कमळ घराघरातून मतदारांपर्यत पोहचवायची आहे. तालुक्याच्या विकासासाठी आपण जसे निर्धारपुर्वक काम केले तसे दुसऱ्या विजयासाठी आपल्याला तेवढ्याच चिकाटीने काम करून यशाचा झेंडा फडकवायचा आहे. भारतीय जनतापक्षाचे सर्व वरीष्ठ नेत्यांच्या आदेशाचे पालन करीत शिस्तीने प्रचाराची ही मोहिम राबवायची आहे.

या वेळी बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की,गेल्या पाच वर्षात प्रशांत ठाकूर यांनी पनवेल शहर व तालुक्यात विकास कामांचा डोंगर उभा केला.डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, १०० खाटांचे सर्वसुविधाजनक उपजिल्हा रूग्णालय,प्रशासकीय भवन, कोर्टाची सुसज्ज वास्तू, अल्पसंख्यांक मुलींसाठी वसतीगृह,महत्वाकांक्षी उड्डाणपुल, अशी अनेक महत्वाकांक्षी विकासकामे केली. गेल्या ५२ वर्षात सतत आमदारकी असलेल्या शेकापला जे करता आले नाही येवढी विकासकामे अवघ्या पाच वर्षात करून दाखविली.तरीही होय आम्हीच हे केले असे सांगून त्यांच श्रेय लाटण्याचा खोटेपणा शेकापवाल्यांकडून सुरू आहे.आमदार म्हणून प्रशांत ठाकूर यांनी पनवेलच्या विकासाचा जो महायज्ञ सुरू केला त्यातून पनवेलचा चेहरामोहरा बदलून गेला आहे. आता पनवेलला विमानतळ येतोय. नव्या शहराची उभारणी सुरू आहे. अशा विकासाच्या बरोबर आपल्याला जायचे असेल तर विकासाची दूरदृष्टी असलेला लोकप्रतिनिधी निवडून देणे गरजेचे आहे. तुमचा उत्साह प्रशांत ठाकूर यांचा विजय पक्का असल्याची ग्वाही देत आहे. मात्र गहाळ न राहता जिद्दीने काम करून कार्यकर्त्यानी हा विजय अधिक लखलखीत करावा असे अवाहनही त्यांनी केले. यावेळी जी.आर. पाटील यांचेही भाषण झाले.

यावेळी लोकनेते स्व.दि.बा.पाटील यांचे चिरंजीव अतुल पाटील, जेएनपीटीचे विश्वस्त महेश बालदी, युवा नेते सुरेश सावंत, परेश ठाकूर, युवा मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, भाजपचे तालुकाध्यक्ष तानाजी खंडागळे, शहर अध्यक्ष प्रदीप जाधव, प्रदेश सदस्य सी.सी.भगत, नंदकुमार पटवर्धन, महेंद्र पाटील, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष कदम, संजय गुरूजी, ज्येष्ठ नेते सुभाषचंद्र शिरोळकर, युवा नेते संजय पाटील, सिध्दार्थ बांठिया, किशोर चौतमोल, दशरथ म्हात्रे, मयुरेश नेतकर, प्रकाश मोरे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत कदम, तालुकाध्यक्ष समिर कदम, वर्षा नाईक, सुहासिनी शिवणेकर, माजी नगरसेवक सिराज सय्यद, प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका कल्पना राऊत, दर्शना भोईर, सुलोचना कल्याणकर, नलिनी शेलार, सिध्दीका पुंजानी, रत्नप्रभा घरत, सुहासिनी केकाणे, देविदास खेडकर, हरिदास वणवे, प्रदीप देशमुख, बाळाराम पाटील उपस्थित होते.